International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या 'आकलन' या पुस्तकातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे नव्या दृष्टिकोनातून स्पष्टीकरण करणारे निवडक लेख

**सुभाष रामलिंगप्पा वैरागकर[1], प्रा. डॉ. राजशेखर नळगे[2]**
[1]*संशोधक, उमरगा, जि.धाराशिव*
[2]*सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग), जवाहर महाविद्यालय अणदूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव*
*Corresponding Author – सुभाष रामलिंगप्पा वैरागकर*
**DOI - 10.5281/zenodo.17662254**

**प्रस्तावना:**

अमर हबीब हे महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथे राहणारे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, साहित्यिक आणि किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते आहेत. ते समाजातील विषमता व अन्यायाविरुद्ध नेहमी आवाज उठवतात. तसेच सामाजिक न्यायासाठीही आग्रही असतात. ते शेतकरी व महिलांचे अधिकार या विषयावर काम करतात. किसानपूत्र आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी विरोधी कायदा रद्द करण्यासाठी आंदोलन झाले होते त्या आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले आहे. मुक्त पत्रकार म्हणून काम करत असताना त्यांनी वृत्तपत्रे, मासिके आणि समाज माध्यमाद्वारे अन्यायाविरुद्ध नेहमी आवाज उठवलेला आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आहे. राष्ट्रसेवादलाच्या माध्यमातून झालेली आंदोलने, 1974 साली झालेले मराठवाडा विद्यार्थी आंदोलन, 1974-75 च्या काळात झालेल्या आदिवासी चळवळी, 1975 ते 77 या काळातील आणीबाणी, 1977 ते 1980 या कार्यकाळात झालेली छात्र युवा संघर्ष वाहिनी, 1980 चे मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, 1980 पासून शेतकरी संघटनेचे झालेली विविध आंदोल,ने 2015 पासून सुरू झालेले किसानपुत्र आंदोलन, या सर्व आंदोलनात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. आणीबाणीत तर त्यांना 19 महिने तुरुंगवासही भोगाव लागला होता. आंबेजोगाई येथून प्रकाशित होणाऱ्या 'भूमी सेवक' या साप्ताहिकाचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम केलेले आहे. शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारणीवर तसेच अभ्यास समितीवर ही त्यांनी काम केलेले आहे. त्यांनी अनेक पुस्तके लिहून समाजातील तात्कालीक समस्यावर भाष्य केलेले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. साहित्य चळवळीतही त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी अनेक शासकीय व बिगर शासकीय समितीवर सुद्धा काम केलेले आहे. त्यांनी आपल्या वैचारिक पुस्तकांमधून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यावर चिंतन करून उपाययोजना सुचविल्या आहेत. याच वैचारिक पुस्तकांमधील 'आकलन' या पुस्तकातील शेतकरी विषयक लेख अभ्यासात आहोत.

अमर हबीब यांची वैचारिक पुस्तके पुढील प्रमाणे आहेत…

**दुष्काळदेशी:**

१९९२ साली मराठवाड्यात पडलेल्या दुष्काळाचे स्पॉट रिपोर्टिंग दैनिक मराठवाडा संभाजीनगर मध्ये 'दुष्काळदेशी' सदराखाली प्रकाशित झाले. त्यातील काही निवडक लेखांचे संकलन 'दुष्काळदेशी' या पुस्तकात आहे.

**डंकेल प्रस्ताव आहे तरी काय?**

जागतिक व्यापार संघटनेसाठी तयार करण्यात आलेल्या डंकेल प्रस्तावाची माहिती सर्वांना मराठीतून करून देणारी ही एक पुस्तिका आहे.

**खुल्या व्यवस्थेत मुसलमानांचे भवितव्य:**

सरकारी धोरणांमुळे मुस्लिम समाजाचे कसे नुकसान झाले याचे सविस्तर विवेचन या पुस्तकात आहे.

**संवाद:**

दैनिक लोकसत्ता च्या मराठवाडा वृत्तांत मधील संवाद सदरात प्रकाशित झालेल्या लेखांचे संकलन या पुस्तकात आहे.

**आकलन:**

2010 च्या आसपास लिहिलेल्या 34 लेखांचे संकलन आकलन या पुस्तकात आहे.

**जनमन:**

लोकसत्ताच्या 'जनमन' या सदरात आलेल्या लेखांचे संकलन या पुस्तकात आहे.

**शेतकरीविरोधी कायदे:**

शेतकरी विरोधी कायद्यांवर लिहिली गेलेली ही एकमेव पुस्तिका आहे. या पुस्तकाच्या ९ आवृत्ती निघाल्या आहेत. तसेच हिंदी, इंग्रजी व गुजराती या तीन भाषेत हे पुस्तक अनुवादित झालेले आहे.

अमर हबीब यांचे लेखन वैचारिक सदरात मोडतं तेही थेट तुमच्या आमच्या भाषेत. याच तुमच्या आमच्या भाषेत लिहिलेल्या लेखांचे संकलन असलेल्या 'आकलन' या पुस्तकात एकूण 34 लेख समाविष्ट आहेत. त्या लेखांतून हाताळलेले विषय सुद्धा तुमच्या आमच्या परिचयाचेच आहेत. शेतकरी हा त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. शेतकरी आयुष्यातील अनेक समस्यावरती ते अस्वस्थपणे व्यक्त होत असतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे एका नव्या दृष्टिकोनातून विश्लेषण ते नेहमीच आपल्या लेखांमधून करत असतात. त्यांचं लेखन हे सर्वांपेक्षा वेगळं आहे हे त्यांच्या लेखांच्या शीर्षकावरूनच लक्षात येतं. त्यांच्या 'आकलन' या लेख संग्रहात एकूण आठ शेतकरी प्रश्नाविषयी लिहिलेले लेख आहेत. त्यांचे शीर्षक पुढील प्रमाणे…

- आत्महत्या खऱ्या आणि खोट्या
- कर्जबळी
- शेतकऱ्यांचे साहित्य का नाही?
- प्रबोधनकार ठाकरे यांचे 'शेतकऱ्यांचे सुराज्य'
- शेतकरी विरोधी कायद्यांचा फास
- मजूर का मिळत नाहीत?
- शेतीतून बाहेर पडण्यासाठी
- झेप घेणारी पाखरे

शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी, त्यांचे होणारे हाल, सरकारचे शेती विषयक विचित्र धोरण, शेतकऱ्यांची पिळवणूक या सर्वच विषयावर त्यांच्या या लेखातून भाष्य केलेले आहे.

**१. आत्महत्या खऱ्या आणि खोट्या:**

*'शेतकऱ्यांच्या आत्महत्या खऱ्या असतात का हो? शेतकऱ्यांच्या नोकरदार मुलांकडून हा प्रश्न मी अनेकदा ऐकलेला असल्यामुळे मला त्यात नाविन्य वाटले नाही.' (पान ७)*

या लेखात ग्रामीण लेखक जे नोकरदार असतात ते कसे सोयीस्कर आपल्या विचारांची पातळी बदलत असतात याविषयी मार्मिक स्पष्टीकरण केले आहे.

*‘सतत त्याच नदात राहिलेल्या लेखक-कवी-साहित्यिक कालांतराने तसाच होऊन जातो. मग त्याला शंका येते खरेच शेतकरी आत्महत्या करतात का?’ (पान ८)*

ग्रामीण लेखक हा शेतकरी कुटुंबातील, ग्रामीण भागातील असतो. त्यामुळे लहानपणीच्या आठवणी जाग्या झाल्या की तो शेतकऱ्यांचा कैवार घेतो दुसरी पातळी असते नोकरदाराची. त्याला नोकरीमुळे बऱ्यापैकी पगार असतो तर तो नोकरीमुळे निर्माण होणारे हितसंबंध जोपासत असतो. त्यातून जर तो लेखक असेल तर त्याला अनेक मान-सन्मान, पुरस्कार हवे असतात. त्यासाठी तो पुढाऱ्यांची स्तुती स्तवने गातो. तो त्यांना भावणारीच भाषा बोलायला लागतो. शेतकऱ्यांच्या आळसामुळे शेतकरी प्रगती करू शकत नाहीत. शेतकरी व्यसनाधीन असतात, अडाणी आहेत त्यामुळे त्यांची प्रगती होत नाही. अशी भाषा त्याच्या तोंडी सहज यायला लागते आणि मग शेतकरी आत्महत्या खऱ्या की खोट्या हा प्रश्नही त्याला पडायला लागतो. या प्रश्नावर अतिशय उपहासात्मक पद्धतीने भाष्य करून अशाप्रकारे विचार करणाऱ्या ग्रामीण, साहित्यिक, नोकरदार जे स्वतः शेतकरी पुत्र असतात त्यांना अमीर हबीब यांनी सुनावले आहे.

लेखाच्या शेवटी ते म्हणतात,

*मी त्यावर रागावलो नाही. रागावून उपयोग नव्हता. शेतकऱ्यांचा दुस्वास करणारे तेच एकटे नाहीत. खालून वरपर्यंत अनेकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकते. या बिचाऱ्याने ती बोलून दाखविली एवढेच. (पान ९)*

**२. कर्जबळी:**

एखाद्या मुलीचा सासरी छळ होऊन तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केले जाते तेव्हा तिच्या आत्महत्येला ‘हुंडाबळी’ म्हटलं जातं. मग शेतकरी सुद्धा अनेक कारणांनी त्रस्त होऊनच आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेला असतो. मग त्याच्या आत्महत्येला ‘कर्जबळी’ हा शब्द का वापरला जात नाही हा प्रश्न अमर हबीब यांना पडल्यामुळे त्यांनी हा लेख प्रपंच केलेला दिसून येतो.

*‘शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला शेतकरी अजिबात जबाबदार नाही. अन्नधान्याचे भाव खालच्या पातळीवर राहावेत म्हणून सर्व पिकांच्या किमती खालच्या स्तरावर ठेवण्यात आल्या. या धोरणांचा परिणाम म्हणून शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडला. कर्जाच्या सापळ्यात अडकलेला व दारिद्र्याने पिचलेला शेतकरी कोणत्या कोणत्या निमित्ताने आत्महत्येला प्रवृत्त होतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना सरकार जबाबदार आहे. जशा त्या मुली ‘हुंडाबळी’ आहेत तसेच हे शेतकरी ‘कर्जबळी’ आहेत. सरकार बळी आहेत. तेथे सासर दोषी मानत असाल तर येथे सरकार दोषी आहे. (पान ११)*

पण दुर्दैवाने असे म्हटले जात नाही. कारण सरकारला दोष देणे हे आपल्या देशात देशद्रोह मानले जाते. त्यामुळे कोणीही असा शब्द वापरायला धजावत नाही. सरकारमध्ये हितसंबंध असल्यामुळे नोकरदार वर्ग, व्यापारी वर्ग असे कोणीही हा शब्द वापरायला धजावत नाही.

*‘सरकारधार्जिणे विचार करणारे लोक कायम सामान्य लोकांना हीन समजत असतात. ब्रिटिश शासक जसे भारतीय रयतेला हीन समजायचे तसेच उच्चभ्रू लोक, शेतकऱ्यांना आणि स्त्रियांना हीन समजतात. ते*

*कायम प्रजेला दोष देत राहतात. प्रजेला त्यांच्या उणिवा दाखवून अपमानित करतात. आत्महत्या हा शब्द वापरण्यामागे तीच मनोभूमिका काम करते. आत्महत्या या शब्दाचा सरळ अर्थ असा की त्याने त्याचा जीव दिला. त्याला तो जबाबदार आहे. तोच दोषी आहे. इतर कोणीही नाही. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. (पान १२)*

या लेखात त्यांनी कर्जमुक्ती अभियानाच्या निमित्ताने महाराष्ट्राभर केलेल्या दौऱ्यातील शेतकऱ्यांच्या काही निवडक प्रतिक्रिया मांडल्या आहेत. त्या वाचल्या की शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल कसा उचलू शकतो हे लक्षात येते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी निर्माण झालेल्या सहकारी बँका शेतकऱ्यांचा गळा कशाप्रकारे कापतात हे विविध काल्पनिक विविध काल्पनिक व प्रत्यक्ष पात्रांद्वारे मांडून त्यांनी सविस्तर स्पष्ट केले आहे. त्यातच बदलत्या जीवनशैलीमुळे शेतकऱ्यांसमोर आरोग्य, शिक्षण, गृह उपयोगी साहित्य व भांडवली गुंतवणूक हे नवे ताण कसे निर्माण झालेले आहेत, आणि त्यामुळे शेतकरी आणखीन वैफल्यग्रस्त कसा बनत चाललेला आहे हे उदाहरणासह स्पष्ट केलेले आहे.

*'सहकाराचा मोठा उदो उदो केला जातो. शेतकऱ्यांच्या विकासाची गंगोत्री म्हटले जाते. शेतकऱ्यांच्या कल्याणाचे नाव घेऊन सुरू झालेल्या सहकारी बँकांनी अक्षरशा शेतकऱ्यांचा गळा कापला. व्याजाची आकारणी करताना कोणतीही दया माया दाखविली नाही. शेती धंदा तोट्यात आणि त्यात कर्जाचा विळखा यामुळे शेतकरी निरुपाय झाला. हतबध्द झाला. हीच परिस्थिती चालू राहिली तर किती शेतकऱ्यांचा कडेलोट होईल हे सांगता येणार नाही.' (पान १४)*

शेतकऱ्यांच्या बिकट परिस्थितीचा हा सगळा पाढा वाचत असतानाच त्यांनी या सगळ्या परिस्थितीतून शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी काही उपाय सुद्धा सुचविले आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील तर त्यांना विकासाच्या परिघात सामील करून घ्यावे व तत्कालीक उपाय करत असतानाच मूळ कारणांचे सुद्धा उच्चाटश करण्यासाठी काही ठोस उपाय त्यांनी सुचविले आहेत.

**बाजारातील हस्तक्षेप थांबवा:**

बाजारात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दलालांच्या एकाधिकारशाही व लायसन परमिट इत्यादी कारणामुळे शेतीमालाच्या भावाची स्पर्धा जणू मरून गेलेली आहे. सरकारने बाजारात कोणताही हस्तक्षेप न करता उत्पादनाची निकोप स्पर्धा कशी वाढेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सरकारने बाजारातील हस्तक्षेप थांबविला पाहिजे असा उपाय अमर हबीब यांनी सुचवला आहे.

**बाहेर पडण्याचा मार्ग उघडा:**

जमीन धारणेची मर्यादा आणि शेती बाहेर रोजगारांचा अभाव या कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्याला त्याचा चरितार्थ कधीच भागवता येत नाही तेव्हा ज्याला शेती सोडायची आहे त्याला ती सहजपणे सोडता यायला हवी. त्यासाठी सरकारने अन्य रोजगारांच्या संधी विकसित कराव्यात. अनावश्यक कायद्यांच्या जंजाळातून उद्योजकांना मुक्त करावे, सरकारी नोकरांचा ससेमीरा थांबवावा, उद्योजकांना वित्त पुरवठा करावा, इत्यादी उपाय सुचविले आहेत.

**मार्शल प्लान हवा:**

दुसऱ्या महायुद्धानंतर जेव्हा अनेक पराभूत देशांच्या अर्थव्यवस्था कोसळल्या व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम आपल्या देशावरी होत आहे हे ओळखून जनरल मार्शल यांनी अर्थव्यवस्थेची घडी नीट बसवू इच्छिणाऱ्या देशांना अमेरिकेच्या आर्थिक सहकार्याचा कार्यक्रम दिला. त्यालाच मार्शल प्लॅन म्हटले जाते.

तेव्हा शेतकऱ्यांना सुद्धा पॅकेज देण्यापेक्षा अशा मार्शल प्लॅनची आवश्यकता आहे तो सरकारने समोर आणावा असा उपाय अमर हबीब यांनी सुचविला आहे.

**कर्ज बेबाक करा:**

कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत हे सर्व मान्य आहे. कारण व्याजाच्या आकारणीत शेतकऱ्यांची बँकांकडून घोर फसवणूक होत असते. या प्रकरणात अब्जावधींचे घोटाळे होतात. एक तर मालाचे भाव पाडून सरकार अगोदरच कर्जाची परतफेड करून घेत असते. त्यामुळे शेतकऱ्यावरचे कर्ज अनैतिकच आहे. शेतकरी सरकारचे काहीही देणे लागत नाही. त्यामुळे शेतकऱ्यावरील कर्ज बेबाक करण्यात यावेत असा उपाय त्यांनी सुचविला आहे.

*'महाराष्ट्रातील एकूण एक शेतकऱ्याचा सातबारा कोरा झाला तर ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण होईल जगण्याची आशा वाटायला लागेल. नव्या जोमाने नवी सुरुवात करता येईल. शेतकऱ्याला नवे कर्ज घेता येईल किंवा ज्यांना जमीन विकायची असेल त्यांना मार्ग मोकळा होईल.' (पान १८)*

**कैफियतींचे सार्वजनिक कार्यक्रम:**

शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी त्यांचे मनोबल वाढणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या कैफियतींचे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले गेले तर एकमेकांना आपले दुःख वाटल्याने त्यांच्या मनाला मोठा आधार मिळेल, आपल्या संकटांची इतरांच्या संकटांशी तुलना करून मार्ग दिसायला लागेल आणि शेतकऱ्यांमध्ये सामूहिक मुकाबला करण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल असा विश्वास अमर हबीब यांना वाटतो.

**आत्मचिंतन:**

शेतकऱ्यांना आत्महत्येस प्रवृत्त करण्यासाठी केवळ सरकारच नाही तर आपण सुद्धा कितपत जबाबदार आहोत याचे आत्मचिंतन आज प्रत्येकाने करण्याची गरज आहे. आणि हे चिंतन केले तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना 'कर्जबळी' किंवा 'सरकार बळी' म्हणण्याचे धाडस आपल्यात निर्माण होऊ शकेल. कारण बाजारात गेल्यानंतर भाजीपाला घेताना आपण किमतीची घासाघीस करून त्याचा भाव कमी करून मागत असतो. परंतु कुठल्या मॉलमध्ये, दुकानांमध्ये गेल्यानंतर आपण असे करत नाही. म्हणजेच शेतीमाल स्वस्त मिळायला पाहिजे, तो आपला हक्क आहे अशी आपली धारणा असते. अशी धारणा ठेवून आपण नकळत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना हातभारच लावत असतो हे प्रत्येकाने लक्षात घ्यायची गरज आहे.

**३. शेतकऱ्यांचे साहित्य का नाही:**

विकास, मग तो कोणत्या क्षेत्रात होणार असो, त्याच्या तळाशी असते शेतीतून निर्माण होणारे अन्न. त्याला वगळून कसलाच विकास होऊ शकत नाही हे स्पष्ट करताना अमर हबीब म्हणतात,

*'शेतीचा शोध लागण्यापूर्वी माणसाला अन्नाची भ्रांत होती. रानावनात भटकायचे, कंदमुळे शोधायची, शिकार करायची आणि भूक भागवायची यात तो व्यस्त असे. शेतीचा शोध लागला. अन्नाची भ्रांत मिटली. मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले. शेतीच्या शोधामुळे मानव जातीची जगण्याची पद्धत बदलून गेली. रानावनात भटकणारी माणसे वसाहती करू लागली. नवनव्या वस्तू निर्माण होऊ लागल्या. त्यांची एकमेकाशी देवाण-घेवाण सुरू झाली. या प्रक्रियेत भाषेचा विकास झाला. त्यातून साहित्य*

*जन्माला आले. अन्नाचे भ्रांत मिटल्यानंतर भाषा, साहित्य, कला आदींच्या विकासाला चालना मिळाली. सर्व कला व साहित्याच्या तळाशी शेतीतून निर्माण होणारे अन्न आहे. त्याला वगळले तर कोणत्याच प्रकारचे साहित्य निर्माण होऊ शकत नाही.' (पान ११)*

या लेखातून त्यांनी साहित्यिकांनाच खडे बोल सुनावले आहेत. शेतकऱ्यांनी अन्नाची तजवीज केली म्हणून साहित्यिक साहित्य निर्माण करू शकतात. त्यामुळे साहित्यिकांनी शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता बाळगायला हवी. परंतु असे न करता ते त्यांच्या प्रत्येक कुठलीही संवेदना बाळगत नाहीत. साहित्यातून शेतकऱ्यांचे जे चित्रण आले आहे त्यांनी त्यांचे तीन गटात विभाजन केले आहे.

- कृषी जीवनाचे उदातीकरण करणारे साहित्य
- शेतकऱ्यांचे विदेशीकरण करणारे साहित्य
- शेतकऱ्यांना खलनायक म्हणून ठरवणारे साहित्य

परंतु साहित्यिकांना खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे दुःख कळले नाही ही खंत त्यांनी या लेखातून मांडली आहे.

महात्मा ज्योतिबा फुले, साने गुरुजी, बहिणाबाई आदी अपवाद सोडून शेतकऱ्यांचे वास्तव चित्रण अभावानेच साहित्यातून आढळले आहे. शेतकऱ्यांबद्दल खरा सहानुभूतीने आजवर लेखन मुबलक प्रमाणात का उपलब्ध झाले नाही या प्रश्नाचे उत्तर पुस्तक कोण वाचत? पुस्तक कोण विकत घेतो? या प्रश्नात आहे असे ते म्हणतात. पुस्तक वाचणारा वर्ग शहरी, बिगर शेती करणारा, प्रामुख्याने नोकरदार असतो. त्याला पगारवाढ हवी असते पण शेतमालाचा भाव वाढला की त्याला चालत नाही. मग तो कशाला शेतकऱ्यांविषयी लिहिलेली पुस्तके विकत घेईल? आणि प्रकाशकतरी अशी पुस्तके कशाला छापेल जी विकली जाणार नाहीत. हे असे सगळे दुष्टचक्र अमर हबीब यांनी खूप सोप्या भाषा शैलीमध्ये उलगडून दाखवले आहे.

**४. प्रबोधनकार ठाकरे यांचे 'शेतकऱ्यांचे सुराज्य'**

या लेखात अमर हबीब यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या शेतकऱ्यांचे स्वराज्य या 1919 साली प्रकाशित झालेल्या पुस्तकातील आठ लेखांमधून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कशाप्रकारे वाचा फोडली हे विस्तृतपणे सांगितले आहे. शेती, शेतकरी यांचे महत्त्व प्रबोधनकार ठाकरे यांनी पुस्तकातून विशद केले आहे. शेतकऱ्यांचे सुराज्य हे देशाच्या स्वातंत्र्यसैनिकांचे खरे स्वप्न होते, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते साकार झाले नाही. आज शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या बघून आज प्रबोधनकार ठाकरे असते तर वेगळी परिस्थिती असली असती असे अमर हबीब म्हणतात.

**५. शेतकरीविरोधी कायद्यांचा फास:**

या लेखात त्यांनी शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्याला बाधा आणणारे तीन कायदे

- जमीन अधिग्रहण कायदा,
- लँड सिलिंग ॲक्ट,
- जीवनावश्यक वस्तू कायदा

या कायद्यांचा घटनेच्या नवव्या परिशिष्टात समावेश करण्यात आल्यामुळे या कायद्याविरुद्ध शेतकरी कोर्टातही जाऊ शकत नाही हे स्पष्टीकरणासह नमूद केले आहे.

*'जोपर्यंत हे तीन कायदे अस्तित्वात आहेत तोपर्यंत शेती व्यवसायात खुलीकरण आले असे कोणी म्हणू शकत नाही. हे तीन कायदे सरकारच्या शेती*

*व्यवसायातील हस्तक्षेपाचे जळजळीत पुरावे आहेत. ते नष्ट केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती आवळला जाणारा फास ढिला होणार नाही. (पान ३०)*

**६. मजूर का मिळत नाहीत?**

*'ज्याला आजची भ्रांत आहे, तो उद्याचा काय विचार करणार? अशा परिस्थितीत ज्यांचे बालपण गेले ते आज प्रौढ झाले आहेत. रोज कमवायचे आणि रोज खायचे, यात त्यांची हयात गेली. आज जेव्हा चार पैसे आले तेव्हा ते काहीसे निवांत झाले आहेत. त्यांच्यासाठी हा अनुभव अगदीच नवा आहे. परिस्थिती बदलली तरी त्यांची विचार पद्धती बदललेली नाही. एका पिढीत बदल घडत नसतो.' (पान 32)*

या निवेदनातून त्यांनी शेतीत काम करण्यासाठी मजूर मिळत नाही म्हणून त्यांना आळशी, ऐतखाऊ, कामचुकार ठरविणाऱ्या वृत्तीला उत्तर दिले आहे. समाजातील सुस्थितीत असलेला वर्ग रेशनचे धान्य मजुरांना मिळते म्हणून ते बसून राहतात, त्यांचे घरबसल्या भागत असल्यामुळे त्यांना काम करायची गरज वाटत नाही, कमी श्रमात जास्त पैसा कोठे मिळेल याकडेच त्यांचे लक्ष असते अशा प्रकारचे दुषणे लावून मजूर वर्गाची कायम निर्भस्थाना करत असतो. अमर हबीब म्हणतात काही काळानंतर मजूर आणखीन महाग होईल. स्वस्तात माणसे राबवण्याचे दिवस आता संपले आहेत हेच खरे आहे. फक्त प्रश्न असा आहे की मजूर मागतील तेवढी मजुरी देऊन त्यांच्याकडून काम करून घेऊ शकेल अशी शेतकऱ्यांची परिस्थिती निर्माण होणे गरजेचे आहे.

**७. शेतीतून बाहेर पडण्यासाठी:**

*'शेती धंदा तोट्यात राहिला. शेतीच्या बाहेर रोजगार निर्माण झाले नाहीत. जमिनीचे तुकडे होत गेले. पन्नास वर्षांपूर्वी साठ एकर वर पाच-सहा माणसे जगत होती. पाच एकर वर पाच माणसांचे कुटुंब मानले तर आज साठ एकरवर साठ माणसे जगत आहेत. बारापट ताण वाढला. एवढा ताण जमीन सोसू शकते का? दुर्दैवाने पर्यावरणवाद्यांना असा प्रश्न कधी पडला नाही. जे शेतकऱ्यांच्या विरोधात आहेत तेवढेच मुद्दे त्यांनी हाती घेतले. आज हा प्रश्न संपूर्ण देशासमोरचा यक्ष प्रश्न बनला आहे.' (पान ३६)*

शेतीतून माणसे बाहेर पडायला हवीत त्याशिवाय प्रश्न सुटणार नाहीत. त्यांना रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण व्हायला हव्यात. जोपर्यंत रोजगाराच्या संधी निर्माण होणार नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या हातात मोठ्या प्रमाणात पैसा येणार नाही. शेतकऱ्यांना शेतीच्या बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य मिळावे यासाठी अमर हबीब तीन मार्ग सुचवितात.

पहिला मार्ग गोल्डन शेक हॅन्ड याचा. म्हणजे कारखान्यामध्ये कामगार जास्त झाल्यानंतर कारखानदार कामगारांना गोल्डन हे शेक हॅन्ड देतो. म्हणजे दहा लाख रुपये देऊन दुसरे काम शोधावयाचा पर्याय देतो. असाच गोल्डन शेक हॅन्ड शेतकऱ्यांना सुद्धा देण्याचा विचार व्हायला हवा.

त्याचबरोबर सरकारने लँड सीलिंग ॲक्ट बरखास्त करावा. जोपर्यंत सिलिंगच्या कायद्याचा अडथळा दूर होणार नाही, तोपर्यंत शेतीवरचा मनुष्याचा भार कमी होऊ शकणार नाही. *तिसरा पर्याय म्हणजे भाडेपट्टीने शेतकऱ्यांना जमीन कसायला द्यायला हव्यात. या पर्यायामुळे शेतकरी आपली जमीन भाडेपट्ट्याने दुसऱ्यांना देऊन स्वतः इतर रोजगार करायला बाहेर पडू शकतील.

*'शेतीत तोट्यात ठेवायची. शेतीच्या बाहेर रोजगार निर्माण होऊ द्यायचे नाहीत. शेतकरी बाहेर पडला तर तो शहराती येईल. आमचे जिने असुरक्षित*

*होईल. म्हणून त्याला शेतीतच अडकवून ठेवा असा विचार करून सिलिंगचा कायदा आला. रोजगार हमी योजना आली. सिंचन योजना राबविल्या गेल्या. अनुदानाची भीक टाकली गेली. हे सगळे साठ वर्षात झाले. शेवटी आज शेतकरी कडेलोटावर जाऊन पोचला. काही शेतकरी कडेलोटावरून घसरले. त्यांनी आत्महत्या केल्या. उरलेल्यांची गर्दी झाली आहे. आज जर या गंभीर प्रश्नावर तातडीने उपाय झाला नाही तर काय होईल? काही सांगता येत नाही. ( पान ३८)*

अमर हबीब यांनी या लेखातून शेतीतून बाहेर पडण्यासाठी शेतकऱ्यांना मार्ग सापडायला हवेत. त्यासाठी सर्व स्तरातून चौफेर प्रयत्न करण्याची गरज आहे असे सुचविले आहे.

### ८. झेप घेणारी पाखरे:

या लेखातून अमर हबीब यांनी महाराष्ट्रातून होणाऱ्या स्थलांतराची सामाजिक संदर्भासह हे स्पष्टीकरण केलेले आहे. ब्राह्मण समाजाने कसे गावगाड्यातून सुटका करून घेतली, त्यानंतर बाबासाहेब आंबेडकरांच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन दलित समाजातील लोकांनी कसे शहरांमध्ये स्थलांतर केले आणि बलुतेदार समाज सुद्धा मोठ्या प्रमाणात गाव सोडून बाहेर कसा पडला हे सांगितले असून शेतकरी समाज मात्र तितकासा गाव सोडून बाहेर पडण्यास राजी नसतो. तो जमिनीशी बांधला गेलेला असतो. तो बाहेर पडू शकत नाही. हे स्पष्ट करताना त्यांनी खूप सुंदर प्रकारे उदाहरणासह स्पष्ट केले आहे.

*'ज्यांनी गावगाडा सोडला, शहरात गेले, शेती सोडली व दुसऱ्या मार्गाला लागले, त्यांची प्रगती झाली. गावागाड्यात अडकलेले आणि शेतीवर गुजरात करणारे बहुसंख्य लोक हलाखीत राहिले. हे वास्तव सगळ्यांना दिसत असताना 'शेतीवर गुजरान करणाऱ्यांनी गाव सोडता कामा नये' हे सूत्र धरूनच सर्व सरकारी योजना आखल्या गेल्या. ग्रामीण गरिबांचे लोंढे शहरात आले तर आपले सगळे सौख्य हिरावून नेतील, आपल्या ऐष-आरामाला बाधा आणतील म्हणून काहीही करा या लोकांना शहरात येऊ देऊ नका असा अलिखित कट करून सर्व योजना तयार करण्यात आल्या. (पान ४०)*

लेखाच्या सुरुवातीलाच त्यांनी ग्रामीण भागातील चांगले बांधकाम केलेल्या घरांचे उदाहरण देऊन ती घरी काही गावातील सरपंच, जमीनदारांची नसून अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलांनी रोजगारासाठी शहराकडे धाव घेतली, त्यांनी कष्टाने पैसे कमवून आपल्या आई-वडिलांसाठी बांधलेले आहेत हे स्पष्ट करून 'झेप घेणारी पाखरे' असे शीर्षक सार्थ केले आहे.

एकूणच, किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या 'आकलन' पुस्तकातील शेतकऱ्यांविषयी लिहिलेले आठ लेख शेतकऱ्यांच्या समस्यांचे, त्यांच्या प्रश्नांचे नव्या दृष्टिकोनातून स्पष्टीकरण करणारे लेख आहेत जे वाचकांना, सरकारला विचारास प्रवृत्त करणारे आहेत. तसेच नव्या दृष्टिकोनातून शेतीविषयक सरकारी धोरणे राबवण्यास मदत करणारे आहेत.